# नैसर्गीक आपत्ती बाबत विविध शासन निर्णयातील तरतुदी

मा.श्री.सचिन्द्र प्रताप सिंह,
जिल्हाधिकारी यवतमाळ

श्री.राजेश रा.खवले,
निवासी उपजिल्हाधिकारी

मंगेश सुलके,
अ.का.नैसर्गीक आपत्ती विभाग

# नैसर्गीक आपत्ती व महसूल प्रशासन

- नैसर्गीक आपत्तीशी मुकाबला हा महसूल विभागाच्या कामकाजाचा अविभाज्य भाग आहे. वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या नैसर्गीक आपत्तीशी सक्षमपणे मुकाबला करुन बाधितांना वेळीच मदत उपलब्ध व्हावी म्हणून महसूल अधिकारी व कर्मचारी यांना खालील बाबींचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांना सुध्दा याची माहिती असणे आवश्यक ठरते.

# नैसर्गीक आपत्ती म्हणजे काय ?

- नैसर्गीक आपत्ती हि निसर्गाची विनाशकारी घटना म्हणता येईल. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानी व जिवीतहानी होते.
- नैसर्गीक आपत्ती जलावरण,मृदावरण व वातावरणाशी संबंधित असल्यामुळे भौगोलिक घटकांशी संबंधित असते. त्यामुळे त्या घटनांचा भौगोलिक परिस्थितीशी संबंध असल्यामुळे भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे गरजेचे ठरते.
- हि नैसर्गीक आपत्ती मनुष्याला पुर्णपणे थांबविता येत नाही. मात्र आपत्तीचे नियंत्रण व पुर्वसुचना, या आधुनिक युगात संगणक व इंटरनेटच्या सहाय्याने अद्यावत स्वरुपात व जलद गतीने प्रसारित करण्याच्या प्रयत्नात मनुष्य आहे व त्यात त्याला बऱ्याच अंशी यश सुध्दा प्राप्त झाले आहे.
- नैसर्गीक आपत्ती उद्भवतांना आपल्या असे लक्षात येईल की ती अचानकपणे उद्भवते उदा.भुकंप, मोठी वादळे, सुनामी इत्यादी.
- नैसर्गीक आपत्ती अचानकपणे उद्भवल्यामुळे त्यात मोठ्या प्रमाणात जिवीत हानी व वित्त हानी होते. फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते.
- नैसर्गीक आपत्तीमुळे झालेले नुकसान भरुण काढण्यास फार कालावधी लागतो. उदा.उत्तराखंडामध्ये झालेल्या ढगफुटीमुळे जे नुकसान झाले ते अद्यापही भरुन निघाले नाही. उत्तराखंडाला त्याचे पुर्ववत स्थिती प्राप्त होण्यास दिर्घ काळ लागू शकतो.
- आपत्ती ह्या दोन प्रकारच्या असतात एक मानव निर्मीत आपत्ती व दुसरी नैसर्गीक आपत्ती.

- ✓ नैसर्गीक आपत्ती पुर्णपणे थांबविण्यास मानवाला अद्यापही यश प्राप्त झाले नाही किंवा मनुष्याला ती थांबविता येत नाही.
- ✓ आजच्या या आधुनिक जगात आपण फक्त आुधनिक उपकरणांच्या सहाय्याने होणारी वित्तहानी व जिवीत हानी पुर्व सुचना देवून कमी प्रमाणात होण्यास मदत करु शकतो.उदा. एखाद्या प्रदेशात सुनामी येत असल्यास हवामानशास्त्राच्या आधारे काही काळपुर्व आपणास माहिती मिळते व त्या माहितीच्या आधारे तेथील लोकांना , प्राण्यांना व काही प्रमाणात मालमत्तेला सुरक्षित ठिकाणी नेण्याचा यशस्वी प्रयत्न करु शकतो.

✓ नैसर्गीक आपत्तीचे काही ठळक घटकानुसार आपण वर्गीकरण करु शकतो ते खालील प्रमाणे

| नैसर्गीक आपत्ती | | |
|---|---|---|
| भौगोलिक | हवामानाशी संबंधित | जैविक |
| 1. भुकंप<br>2. ज्वालामुखी<br>3. सुनामी<br>4. जमीनीची धुप<br>5. जमीन खचने, इत्यादी | 1. पुर<br>2. गारपिट<br>3. दुष्काळ<br>4. हिमवृष्टी<br>5. थंड व उष्ण हवेच्या लाटा<br>6. सुनामी | 1. टोळधाड<br>2. साथीचे रोग (कॉलरा) |

# नैसर्गीक आपत्तीमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो ?

महाराष्ट शासन महसूल व वनविभाग यांचे शासन निर्णय क्रमांक सीएलएस-2012*/प्रकं 157/म-3 मंत्रालय मुंबई 032 दिनांक 30.01.2014 नुसार खाली बाबींचा समावेश नैसर्गीक आपत्ती मध्ये करण्यात आला आहे.

- 1.केंद्र शासनाने नैसर्गीक आपत्तीमध्ये चक्रीवादळ, भुकंप, आग, पुर, सुनामी, गारपिट, दरड कोसळणे, बर्फखंड कोसळणे (हिमवर्षाव), टोळधाड, दुष्काळ, ढगफुटी व कडाक्याची थंडी या आपत्तींचा समावेश केला आहे.
- 2.सदर आपत्ती करिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत अनुज्ञेय आहे. सदर मदतीचे दर राज्य शासनामार्फत घोषित केलेल्या अवेळी पाऊस, अतिवृष्टी (शेत पिकांच्या नुकसानीसह सर्व नुकसान) आकस्मीक आग, समुद्राचे उधान, विज कोसळणे या आपत्ती करिता ही लागु करण्यात आले आहे.
- 3. त्याच प्रमाणे राज्य शासनाचे केंद्र शासनाचे विहीत निकष / मदतीच्या व्यतीरिक्त वेळोवेळी अतिरिक्त मदत जाहिर केल्यास ती देखील राज्य शासनाचे निधीतून अनूज्ञेय राहील

# नैसर्गीक आपत्तीमध्ये जिवीत हानी/ वित्तहानी इत्यादीं करिता देय मदत

(महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक सीएलएस 2015/प्रक्र 40/म-3/दिनांक 13.05.2015 नुसार)

## *व्यक्ती / कुटुंबांना देय मदत*

- 1.वरील नमुद नैसर्गीक आपत्तीमध्ये कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यु झाल्यास योग्य त्या प्राधिकाऱ्याने मृत्युचे कारणे प्रमाणित करण्याच्या अधिन राहून मृत व्यक्तींच्या वारसांना 4.00 लक्ष रु. इतकी मदत देता येते.
- 2.आपत्तीमध्ये मदत कार्य तसेच पुर्व तयारीमध्ये सहभागी व्यक्तींना देखील मदत देता येईल.
- 3. नैसर्गीक आपत्तीमध्ये अवयव अथवा डोळे निकामी झाल्यास त्यांना अर्थ सहाय्य म्हणून 40% ते 60% अपंगत्व आल्यास रु.59,100 देता येते.
- 4. नैसर्गीक आपत्तीमध्ये अवयव अथवा डोळे निकामी झाल्यास त्यांना अर्थ सहाय्य म्हणून 60% पेक्षा अधिक अपंगत्व आल्यास रु.2,00,000/-देता येते. या बाबत अपंगत्वाचे प्रमाण व त्याच्या कारणाबाबत शासकिय दवाखाना/ इस्पितळातील वैद्यकिय अधिकाऱ्याचे प्रमाणीत करणे आवश्यक राहिल.

- 5. नेसर्गीक आपत्तीमध्ये जखमी झाल्यास एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधी करिता दवाखान्यात दाखल झाल्यास रु. 12,700/- देता येते. व एक आवठड्यापेक्षा कमी कालावधी करिता दाखल झल्यास रु.4,300/- मदत म्हणून देता येईल.
- 6.नैसर्गीक आपत्तीमध्ये दोन दिवसांपेक्षा अधिक कालावधी करिता क्षेत्र पाण्यात बुडाले असल्यास / घरे पुर्णत: वाहून गेली असल्यास / पुर्णत : क्षतीग्रस्त झाली असल्यास कपडे / भांडी/ घरगुती वस्तुंकरिता अर्थसहाय्य म्हणून प्रतिकुटुंब रु.1,800/- कपड्यांचे झालेल्या नुकसानी करिता व प्रति कुटुंब 2,000/- घरघुती भांडी / वस्तु नुकसानी करिता देता येते.
- 7.नैसर्गीक आपत्ती मध्ये गंभीरपणे प्रभावित झालेल्या कुटुंबियांना दैनदिन मदत म्हणून मदत छावणीमध्ये आश्रय न घेतलेल्या प्रति प्रौढ व्यक्तीस रु.60/- व प्रति बालकास रु.45/- मदत देता येईल.त्याचप्रमाणे राज्यशासनाने आपत्तीग्रस्तांना कोणत्या पध्दतीने व कश्या प्रकारे मदत देण्यात येईल याबाबतची जिल्हानिहाय कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत सुचविले आहे.

# कृषी विषयक मदत

- 1. दोन हेक्टर मर्यादेत जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत - शेत जमिनीवरील गाळ (वाळूचा /गाळाचा/मातीचा थर 3 इंचापेक्षा जास्त जमा झाल्यास) राज्य शासनाचे प्राधिकृत अधिकाऱ्याने प्रमाणित (certified) करुन प्रत्येक बाबीकरिता रु.12,200/- प्रतिहेक्टर देता येईल.(मात्र लाभार्थ्याने अन्य कोणत्याही शासकिय योजनेखाली मदत अथवा अर्थसहाय्य / अनुदान घेतलेले नसावे.) सदर बाब डोगराळ शेत जमिनीवरील मातीचा ढिगारा (मलबा) काढणे तसेच मत्सशेती दुरुस्ती करणे/ मातीचा थर काढणे/ पुर्ववत करण्याकरिता लागू आहे.
- 2. दरड कोसळणे, जमीन खरडणे, खचणे व नदी पात्र / प्रवाहात बदलल्यामुळे शेत जमीन वाहून जाणे या बाबींकरिता महसूल अभिलेखा नुसार शेत जमीनीचे मालक असलेल्या फक्त अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना रु.37,500/- प्रति हेक्टर या दराने मदत अनुज्ञेय राहील.

# 33% व त्यापेक्षा अधिक झालेल्या शेतीपिकांच्या नुसकसानीसाठी

- 1. शेती पिके फळ पिके आणी वार्षीक लागवडीची पिके या बाबत कोरडवाहू क्षेत्रासाठी रु.6,800/- प्रति हे. आणि पेरणी केलेल्या क्षेत्राच्या मर्यादेत, आश्वासित जलसिंचन योजनेखालील क्षेत्राकरिता रु 13,500/- प्रति हे मदत देता येईल. सदर मदत कमीत कमी रु.1,000/- पेक्षा कमी नसावी आणि पेरणी केलेल्या क्षेत्राच्या मार्यदेत देता येईल.
- 2. बहुवार्षीक पिकांचे बाबतीत पिकांकरिता प्रति हेक्टरी रु.18,000/- देय राहिल. सदर मदत पेरणी केलेल्या क्षेत्राकरिताच देय असून ती कमीत कमी रु.2,000/-पेक्षा जास्त नसावी.
- 3. रेशीम  उत्पादन बाबत एरी, मलबेरी ,टसर रेशीमसाठी रु.4,800/- प्रति हेक्टर व मुगा रेशीमसाठी रु.6,000/- प्रति हेक्टर मदत देता येईल.

# पुशुसंवर्धनाच्या नुकसानीकरिता अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना मदत

- 1. नैसर्गीक आपत्तीमध्ये दुधाळ जनावरांकरिता ज्यात म्हैस/गाय/उंट/याक/मिथून इत्यांदी करिता रु.30,000/- मदत देय राहिल.(3 दुधाळ जनावरांच्या मर्यादेत).मेढी /बकरी/डुक्कर यांना रु.3,000/- देय राहिल.(30 छोटी दुधाळ जनावरांच्या मर्यादेत)
- 2.नैसर्गीक आपत्तीमध्ये ओढकाम करणारी जनावरे दगावल्यास ज्यामध्ये उंट/ घोडा/बैल इत्यादीचा समावेश होतो त्याचे मालकांना रु.25,000/- व 16,000/- रु. वासरु/गाढव/ शिंगरु/खेचर यांना देय राहिल. (ओढकाम करणारी 3 मोठी जनावरांच्या मर्यादेत )(6 लहान ओढकाम करणाऱ्या जनावरांच्या मर्यादेत) वरील बाब राज्य शासनाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने नुकसानीबाबत प्रमाणित (certified) करणे आवश्यक आहे.
- 3.नैसर्गीक आपत्तीमध्ये कोंबड्यांचा मृत्यु झाल्यास मदत रु.50/- प्रति कोंबडी रु.5,000/- प्रति कुटुंब मर्यादेत. अन्य कोणत्याही शासकिय योजनेखाली मदत उपलब्ध करण्यात आली असेल तर या योजनेअंतर्गत मदत देता येणार नाही. उदा.पक्षांमधिल हिवताप किंवा तत्सम रेग यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या स्वतंत्र योजने खाली कुक्कुटपालन मालकांना मदत देण्यात येते.

- 4.जनावरांच्या छावण्यासाठी चारा/पाणी/पशुखाद्य आणि औषधे उपलब्ध करुन देणे बाबत मोठ्या जनावरा करिता रु.70/- प्रतिदिन व छोटे जनावरांकरिता रु.35/- प्रतिदिन देय आहे. राज्य कार्यकारी समिती मदतीचा कालावधी निश्चित करले आणि (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीबाबतीत) केंद्रीय पथक कालावधी निश्चित करेल. मात्र याबाबतचा ठरवून दिलेला मुळ कालावधी 30 दिवसापर्यंत राहिल. सदर कालावधी प्रथमत: 60 दिवसाकरिता व तीव्र दुष्काळ परिस्थितीमध्ये 90 दिवसांकिराता वाढविता येईल. प्रत्यक्ष आपत्तीची परिस्थीती विचारात घेवून, राज्य कार्यकारी समितीस सदर कालावधीमध्ये वाढ करता येईल तथापी या बाबतीत होणारा खर्च राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षीक वाटपाच्या 25% पेक्षा अधिक असता कामा नये. या बाबत राज्य कार्यकारी समितीने गरजेनुसार निश्चित केलेले आणि केंद्रीय पथकाने (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या बाबतीत ) शिफारस केलेले अंदाज हे पशुगणनेशी सुसंगत आणि सक्षम प्राधिकाऱ्याने औषधी , लसीचा पुरवठा नैसर्गीक आपत्तीशी निगडीत असल्याचे प्रमाणित (certified) करण्याच्या अधीन राहून मदत देता येईल.
- 5. छावणीतील जनावरा व्यतिरिक्त इतर बाहेरील जनावरांसाठी चारा वाहतूक या बाबीसाठी राज्य कार्यकारी समितीने आणि (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीप्रकरणी ) केंद्री पथकाने शिफारस केल्याप्रमाणे वाहतुकीवरील प्रत्यक्ष खर्चाचे मुल्यांकन पशुधन गणनेच्या संख्येशी सुसंगत असावे असे नमुद केले आहे.

# मत्स व्यवसाया बाबत

- 1मत्स्य व्यावसायीकांना बोटीची दुरुस्ती, जाळी यासाठी मदत देय आहे त्याकरिता रु.4,100/- बोटीची अंशत: दुरुस्तीसाठी  रु.2,100/- अंशत: बाधित झालेल्या जाळ्यांच्या दरुस्तीसाठी , रु.9,600/- पुर्णत: नष्ट झालेल्या बोटीकरिता व रु.2,600/- पुर्णत: नष्ट झालेल्या जाळींसाठी देय आहे.आपत्ती प्रसंगी शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली अनुदान/ मदत घेतली असल्यास सदर मदत अनुज्ञेय राहणार नाही.
- 2.मत्स्यबीज शेतीसाठी निविष्ठा मदत या बाबीसाठी रु.8,200/- प्रति हेक्टर देय आहे. (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्योत्पादन विभाग , कृषी मंत्रालय यांच्या योजनेनुसार एकदा दिलेल्या अनुदा व्यतिरिक्त, आपत्ती प्रसंगी दुसऱ्या कोणत्याही शासनाच्या कोणत्याही योजनेखाली अनुदान / मदत घेतली असल्यास मदत देता येणार नाही.)
- .3. छावणीतील जनावरां व्यतिरिक्त इतर बाहेरिल जनावरांसाठी चारा वाहतूक या बाबीसाठी राज्य कार्यकारी समितीने आणी (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीप्रकरणी ) केंद्रीय पथकाने शिफारस केल्याप्रमाणे वाहतुकीवरील प्रत्यक्ष खर्चाचे मुल्यांकन पशुधन गणनेच्या संख्येशी सुसंगत असावे असे नमुद केले आहे.

# हस्तकला / हात-माग - कारागीरांना मदत

- .1.खराब झालेल्या सयंत्राच्या दुरुस्ती किंवा नुतनीकरणासाठी या बाबीकरिता रु.4,100/- प्रति कारागीर सयंत्रासाठी मदत देय आहे. राज्य शासनाने निर्देशीत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने सयंत्राचे नादुरुस्ती व नुतनीकरण प्रमाणित certified)  करणे आवश्यक आहे.
- 2.कच्चा माल/उत्पादनाच्या प्रक्रियेत माल व तयार असलेल्या मालाच्या नुकसानीकरिता रु.4,100/- प्रति कारागीर कच्च्या मालासाठी देय आहे. राज्य शासनाने निर्देशीत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने नुकसानीमुळे ती (खराब झालेला कच्चा माल ) बदलने आवश्यक असल्याचे प्रमाणित (certified) करणे आवश्यक आहे.

# बाधितांना घर पुनर्बांधणी करिता  मदत

- 1.नैसर्गीक आपत्तीमध्ये पुर्णत : नष्ट/ पडझड झालेल्या घरांकरिता सखल भागासाठी बाधित घरांसाठी रु.95,100/- प्रति घर , दुर्गम भागातील (integrated Action (IAP) जिल्हासह) बाधित घरांसाठी रु.01,01,900/- प्रति घर मदत देय राहिल.
- 2. नैसर्गीक आपत्तीमध्ये अंशत: पडझड पक्क्या घरांसाठी रु.5,200/- व कच्च्या घरांसाठी रु.3200/- (किमान 15% पडझड झाली असल्यास ).मदत देय राहिल.
- 3.पडझड झालेल्या /नष्ट झालेल्या झोपडी करिता रु.4,100/- प्रति झोपडी (      झ ोपडी म्हणजे तात्पुरते काम चलावू झोपडे,कच्च्या घरांपेक्षा तकलादू,झावळ्या , माती ,प्लास्टिक इत्यादीपासून तयार केलेले राज्य व जिल्हा स्तरिय अधिकाऱ्यांनी झोपडी म्हणून प्रमाणीत केलेले) राज्य शासनाच्या संबंधित प्राधिकाऱ्याने बाधित झालेले घरे हे अधिकृत असल्याचे प्रमाणीत करणे आवश्यक आहे.
- 4.घराला लागून आलेला गोठा या करिता रु.2,100/- प्रति गोठा मदत देय आहे.

# क्षतीग्रस्त बाधित क्षेत्र पुर्ववत करणे

- 1. सार्वजनिक क्षेत्रातील जमा झालेला कचरा व ढिगारे उचलणे या बाबत राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून रक्कम उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास राज्य कार्यकार समितीकडून आवश्यकतेप्रमाणे मुल्यांकनानुसार काम सुरु झाल्याच्या दिवसापासून कामावर 30 दिवसाचे आत झालेला प्रत्यक्ष खर्च राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून रक्कम देय असल्यास केंद्रीय पथकाचे मुल्यांकना नुसार मदत उपलब्ध करुन देण्यात येईल.
- 2. पुरग्रस्त बाधित क्षेत्रातून पाण्याचा निचरा करण्याबाबत राज्य कार्यकारी समितीने मुल्यांकित केल्यानुसार , काम सुरु झाल्याच्या दिवसापासून 30 दिवसांचे आंत कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च राज्य आपत्ती प्रतिसादर निधीमधून आणि केंद्रीय पथकाने मुल्यांकित केल्यानुसार (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीप्रकरणी ) मदत उपलब्ध करुन देण्यात येईल.
- 3.मृत देहांची विल्हेवाट लावणेबाबत राज्य कार्यकारी समितीने आणि केंद्रीय पथकाचे शिफारसी नुसार (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या बाबतीत) आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष खर्चाचे आधारे मुल्यांकन करेल.

# मदत कार्याबाबत देय मदत

- 1. आपत्तीमध्ये मदत, छावणीमध्ये आश्रय घेतलेल्या व्यक्तींकरिता तात्पुरती राहण्याची व्यवस्था, अन्नधान्य, कपडे, औषधोपचार इत्यादीकरिता मदत देय राहिल. मदत देत असतांना राज्य कार्यकारी समितीने आवश्यकतेनुसार निश्चित केल्याप्रमाणे आणि केंद्रीय पथकाने शिफारस केल्यानुसार (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देत असल्यास) 30 दिवसांच्या कालावधी करिता अर्थसहाय्य देता येईल.राज्य कार्यकारी समितीने मदत छावण्यांची संख्या, कालावधी तसेच छावण्यातील बाधितांची संख्या या माहितीच्या आधारे कालावधी व छावण्यांची संख्या निश्चीत करेल. भुकंप, पुर, दुष्काळ इत्याद तीव्र स्वरुपाच्या नैसर्गीक आपत्तीमध्ये सदर कालावधी 60 दिवसांकरिता वाढविता येईल व तिव्र दुष्काळी परिस्थीमध्ये तो 90 दिवसांकरिता वाढविता येईल. प्रत्यक्ष आपत्तीची परिस्थीती विचारात घेवून राज्य कार्यकारी समितीस सदर कालावधीमध्ये वाढ करता येईल. तथापी या बाबींसाठी होणारा खर्च राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षीक तरतुदीच्या 25% अधिक असता कामा नये असे नमुद केले आहे. वैद्यकिय मदत राष्ट्रीय आरोग्य मिशन (NRHM) मधून देण्यात यावी.
- 2. हवाई मार्गे आवश्यक वस्तुंचा पुरवठा करणे या बाबत राज्य कार्यकारी समितीने केंद्रीय पथकाचे शिफारसी नुसार (राष्ट्रीय आपत्ती निधीच्या बाबतीत ) आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे मुल्यांकन करेल. केंद्रीय संरक्षण मंत्रालयामार्फत सादर केलेल्या प्रत्यक्ष खार्चाच्या देयकाच्या मर्यादेत राहिल तसेच हवाई मार्गाने आवश्यक वस्तुंचा पुरवठा करणे व बचाव कार्य करणे या प्रयोजना करिताच सदर मदत देता येईल.
- **3**.ग्रामीण व नागरी भागाकरिता पाणीच्या पाण्याचा आकस्मीक पुरवठा बाबत राज्य कार्यकारी समितीने आणि केंद्रीय पथकाचे शिफारसी नुसार (राष्ट्रीय आपत्ती निधीच्या बाबतीत ) आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष खर्चाचे आधारे मुल्यांकन करेल हा कालावधी 30 दिवसांसाठी तसेच व दुष्काळजन्य परिस्थीतीत सदर मुदत 90 दिवसांपर्यंत वाढविता येईल.तसेच प्रत्यक्ष आपत्तीची परिस्थीती लक्षात घेवून राज्य कार्यकारी समिती सदर कालावधीमध्ये वाढ करता येईल. तथापी या बाबींसाठी होणारा खर्च राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षीक तरतुदीच्या 25% अधिक असता कामा नये.

# शोध व बचाव बाबत देय मदत

- 1. नैसर्गीक आपत्तीमध्ये प्राण वाचविण्याकरिता तातडीचे मदत कार्य करण्याकरिता बोटी भाड्याने घेतल्या असल्यास राज्य कार्यकारी समितीने मुल्यांकित केलेल्या व (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीबाबतीत ) केंद्रीय पथकाने शिफारस केलेला प्रत्यक्ष खर्च देता येईल. विहित नैसर्गीक आपत्तीमध्ये प्राण वाचविण्याकरिता तसेच आपत्तीमध्ये अडकेलेल्या व्यक्तींची सुटका करण्याकरिता बोटी भाड्याने घेणे आणि आवश्यक साधनांचा वापर करण्याकरिता येणारा प्रत्यक्ष खर्च देता येईल.
- 2.शोध व बचाव उपयोजना /बाधित व्यक्ती /बाधित होणाऱ्या व्यक्तींना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठीचा खर्च - राज्य कार्यकारी समितीने मुल्यांकित केलेले व (राष्ट्रीय आपत्ी प्रतिसाद निधीबाबतीत) केंद्रीय पथकाने शिफारस केलेला प्रत्यक्ष खर्च - केंद्रीय पथकाने आपदग्रस्त क्षेत्रास भेट देण्यापुर्वी वरील कार्यवाही पुर्ण झालेली असेल, त्यावेळी राज्य स्तरीय समिती आणि केंद्रीय पथक प्रत्यक्ष झालेला खर्च अथवा जवळपास येणारा खर्च याबाबत शिफारस करेल.

# पुरवठा

- आपत्तीला प्रतिसाद  देण्यासाठी तसेच शोध कार्य बचाव कार्य स्थलांतरण इत्यादीसाठी लागणारी उपकरणे व दळणवळणाची साधण- राज्य कार्यकारी समितीने मुल्यांकित केल्या नुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधूनच खर्च करावा.(राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून नाही.)
- राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या एकुण वार्षीक तरतुदीच्या 10% पेक्षा अधिकची रक्कम या बाबीवर खर्च करु नये.
- क्षमता बांधणी :- राज्य कार्यकारी समितीच्या मुल्यांकना नुसार या करिता फक्त राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून खर्च देय असेल.(केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून नाही.) या करिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षीक तरतुदीच्या 5% हून अधिक खर्च अनुज्ञेय नाही.
- राज्य शासनाने त्यांच्या स्थानिक आपत्ती करिता जे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार अनुज्ञेय नसतील अशा आपत्तीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षीक तरतुदीच्या 10% मर्यादे पर्यंत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून खर्च अनुज्ञेय राहिल. राज्य कार्यकारी समितीने मुल्यांकित केलेला मात्र केवळ राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून खर्च अनुज्ञेय राहिल (केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधी मधून नाही.)

- अन्य अधिसुचित नैसर्गीक आपत्ती करिता वर नमुद केलेल्या मानकानुसार विविध बाबींकरिता मदत सारख्या प्रमाणात राहिल किंवा ,
- अशा प्रकरणी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी नुसार ठरवलेल्या दरापेक्षा अधिक दराने स्थानिक आपत्ती करिता मदत अनुज्ञेय असणार नाही.
- या संदर्भात राज्य शासनाने स्थानिक आपत्तीची सुची निर्धारित करणे आवश्यक आहे जेणे करुन वर नमुद निकष व दरानुसार स्थानिक आपत्ती करिता मदत देण्यामध्ये पारदर्शकता राहिल. त्या करिता एक प्रक्रिया निश्चित करुन स्थानिक आपत्तीमध्ये बाधित लाभार्थी यांना राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेने मदत देणे शक्य होईल.

# पायाभुत सुविधा

- बाधित झालेल्या मुलभुत सुविधांची (तातडीच्या स्वरुपाची दुरुस्ती / पुनर्स्थापना) I) रस्ते व पुल II) पाणी पुरवठा कामे / योजना III)सिंचन व्यवस्था IV)विज पुरवठा (बाधित क्षेत्रात तातडीने विज पुनर्स्थापित करण्यापुरते मर्यादित) V)शाळा VI) प्राथमिक आरोग्य केंद्र VII)पंचयातीच्या मालकीची समाजिक मालमत्ता
- दुरसंचार व्यवस्था व उर्जा (तातडीने विजपुरवठा पुनर्स्थापित करणे वगळून) निर्माण करणाऱ्या व त्यापासून महसूल मिळविणाऱ्या स्वत:च्या निधीतून तातडीची दुरुस्ती व पुनर्स्थापनेची कामे करणारे क्षेत्र वगळून
- मुल्यांकनाच्या अंदाजाबाबत:- राज्य कार्यकारी समितीने निकडीनुसार राज्यातील दुरुस्तीचे दर / किंमत /दुरुस्तीचा कालावधी निर्धारित करावे तसेच (राष्ट्रीय आपत्ती निधीच्या अनुषंगाने) केंद्रीय पथकाच्या शिफारसी नुसार मदत देय राहिल.

- अतिवृष्टी /पुर/चक्रीवादळ/भुस्सखलन/वाळूचा ढिगारा इत्यादीमुळे बाधित झालेल्या रस्त्यांची दळणवळन पुनर्स्थापित करण्यासाठी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी भारतातील रस्ते दुरुस्ती 2001 च्या मानकानुसार विहित केलेल्या व वेळोवेळी दुरुस्तीत करण्यात आलेल्या अटि व शर्ती विचारात घ्यावात. संदर्भासाठी हे निकष खालील प्रमाणे आहे.

- सर्व साधारण व नागरी भागासाठी :- सर्वसाधारण दुरुस्तीच्या व नियतकालीक दुरुस्तीच्या एकुण रक्कमेच्या 15%
- टेकड्या :- सर्वसाधारण दुरुस्तीच्या व नियतकालीक दुरुस्तीच्या एकुण रक्कमेच्या 20%

- ¸स्त्यांच्या दुरुस्तीकरीता राज्य शासनाने अधिसुचित केलेल्या सर्वसाधारण दुरुस्ती व नियतकालीक दुरुस्तीवर अधारित अर्थसहाय्य देता येईल. जर सर्व साधारण दुरुस्ती व नियतकालीक दुरुस्तीचे दर उपलब्ध नसतील तर राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हे रस्त्यांकरिता रु.1 लाख प्रति कि.मी. आणि ग्रामीण रस्यांकरिता रु.0.60 लक्ष प्रति कि.मी. प्रमाणे अर्थसहाय्य देय राहिल. मात्र च्राज्य शासनाने त्यांच्या अर्थसंकल्पात नियमीत देखभाल व दुरुस्ती करिता केलेली तरतुद प्रथमतः वापरण्यात यावी छ हि अट अस्तित्वात राहणार नाही कारण या बाबतच्या अटीचे सनियंत्रण करणे अवघड होते. तरिदेखील या बाबतची प्रथमतः जबाबदारी सर्व राज्यांची आहे. जलसिंचन व्यवस्था व पुलाचे दुरुस्ती साठी राज्य शासनाने अधिसुचित केलेल्या दरानुसार मदत देय राहिल. लघु सिंचन व्यवस्थेकरिता क्षत्रग्रस्त योजनेसाठी रु.1.50 लक्ष प्रमाणे अर्थसंकल्पात अनुज्ञेय राहिल.क्षत्रीग्रस्त झालेले मध्यम व मोठे प्रकल्पांच्या पुनर्स्थापनेसाठी बंधाऱ्याच्या क्षत्रीग्रस्त भागाकरिता ग्रामीण रस्त्यासांठी निर्धारित केलेल्या दराच्या धर्तीवर अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. मात्र अस्तित्वात असलेल्या योजनेमधून त्यासाठी अर्थ सहाय्य अनुज्ञेय असता कामा नये.

- क्षतीग्रस्त झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या योजनेबाबत पात्र असलेल्या क्षत्रीग्रस्त पिण्याच्या पाण्याच्या संरचनेच्या दुरुस्तीकरिता रु.1.50 लक्ष प्रमाणे मदत देय राहिल.
- क्षतीग्रस्त झालेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे ,अंगणवाडी आणी पंचयातीच्या मालकीच्या सामुदायीक मालमत्तेच्या दुरुस्तीकरिता रु.2.00 प्रति संरचना या प्रमाणे अर्थ सहाय्य देय राहिल.
- क्षतीग्रस्त झालेल्या उर्जा क्षेत्रातील बाधीत झालेल्या 11 केव्ही पर्यंतचा ट्रान्सफार्मर , खांबा आणी कंडक्टर साठी मदत अनुज्ञेय असेल प्रति खांब रु.4000/- बाधित कंडक्टर करिता रु.0.50 लक्ष प्रति कि.मी. आणि बाधित झालेल्या ट्रान्सफार्मर करिता रु.1.00 प्रमाणे मदतीचे दर राहतील.

# अंतिम

- वरील प्रमाणे विविध नैसर्गीक आपत्ती मध्ये NDRF व SDRF चे मानकानुसार मदत देय असली तरीही नैसर्गीक आपत्ती निवारणासाठी लोकांचा सहभाग हा अनिवार्य ठरतो. त्यात प्रामुख्याने सेवाभावी संस्था, महाविद्यालयातील विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना,समादेशक (होमगार्ड), विविध सामाजिक संस्था व इत्यादींचा सिंहाचा वाटा असतो याचे मदतीशिवाय शासनास कोणत्याही नैसर्गीक आपत्तीला तोंड देणे अशक्य असते.
- विविध नैसर्गीक आपत्तीमध्ये शासन आर्थीक मदत करित असली तरीही अद्यापही काही बाबीचा समावेश यात करणे अपरिहार्य ठरते. उदा. सर्पदंश (हिंस्त्र श्वापद किंवा विषारी प्राणी) होवून एखाद्या व्यक्तीचा मृत्यु झाल्यास त्याला मदत द्यावयास हवी. परंतु शासनाचे निकषात ते बसत नसल्यामुळे त्या व्यक्तीच्या कुटुंबियांना मदत देता येत नाही. त्याच पध्दतीने एखाद्या शेतकऱ्यांच्या धान्यास आग लागल्यास त्या व्यक्तीस कोणतीही मदत देय नाही. तसेच मान्सून कालावधी व्यतिरिक्त डोहात/धबधब्यात/विहरित पडून/विजेचा धक्का लागून एखाद्या व्यक्ती मय्यत झाल्यास त्याला सुध्दा मदतीची तरतुद करणे गरजेचे वाटते.
- नैसर्गीक आपत्तीचा विचार करता जागतिकीरनाचा पर्यावरणावर फार मोठ्या प्रमाणात परिणाम होत असल्याचे दिसून येते. याला जबाबदार आपणच नागरिक आहोत. उदा. पृथ्वीचे वाढते तापमान, वातावरणात वाढणारे कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण, हिमालयातील बर्फ वितळणे, समुद्रातील पाण्याचा प्रवाह बदलने, पाण्याची पातळी एकदम वाढणे किंवा कमी होणे,पाण्यात मिसळणारे विविध विषारी क्षार, याचा आपल्या जीवनावर परिणाम तर होतोच पर्यायाने पर्यावरणावर सुध्दा परिणाम झाल्याचे दिसून येते. भविष्यात मानवावर अशी वेळ येवू नये की त्याला श्वसनाकरिता ऑक्सीजन सुध्दा विकत घ्यावे लागेल.
- यावर एकच पर्याय तो म्हणजे निसर्गाकडे चला. झाडे लावा, झाडे जगवा. संत तुकाराम महाराज यांनी ज्या प्रमाणे वृक्षांना आपले मित्र आपले नातेवाईक मानावे असा सल्ला दिला आहे तोच एक मंत्र " वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ..." आपल्याला भविष्यात वाचवू शकेल.

# समाप्त…